ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# बेटी मला क्षमा कर

प्रेमनाथ जैन पलंगावर पडल्या पडल्या हातात पत्र धरून खिडकीबाहेर पाहत होते. घराबाहेरच्या मोठ्या बगीच्याला त्यांचा जुना,त्यांच्या पत्नीने-सरोजिनी देवीने ठेवलेला माळी पाणी घालत होता. त्याने इमानदारीने प्रेमनाथजींच्या इच्छेप्रमाणे घराभोवतालचा मोठा बगीचा अगदी होता तसा ठेवला होता. पूर्वीसारखीच गुलाबाची फुलं दारावरच्या कमानीवर बहरलेली होती. घराच्या दारापर्यंत येणारी वळणदार दगडी वाट दोन्ही बाजूला लावलेल्या रंगी बेरंगी डेलियांनी सजलेली होती. वाटेच्या शेजारच्या दोन चिमुकल्या गोलांत शेवंती फुलली होती. अन् दरवाज्यांत दोन मोठ्या,वेगवेगळ्या रंगांच्या फुलांनी फुललेल्या कुंड्या होत्या.

‘फक्त बगीचा तेवढा होता तसा आहे.’ प्रेमनाथजींच्या खिन्न मनात विचार आला की, ‘बाकी सगळ बदललंय,आपलं जगच फिरलंय,आणि आता आपणही फार थकलोय,परिस्थिती बदलण्याची ताकद आता आपल्यात नाही.’

पत्रातला ‘कमल परत येतेय.’ हा मजकूर वाचून त्यांच्या मनात एकीकडे आनंद मावत नव्हता. पण त्या बरोबरच कमलसाठी एक अनामिक भीतीही वाटत होती. तिचे भाऊ तिला काय करतील याची!

कमलच्या मोठ्या भावाने-मुन्नाने-दिलेली धमकी त्यांच्या कानात रात्री अपरात्री घुमत रहायची, “येऊ दे तर तिला,गळा दाबून मारून टाकीन.” “या वास्तूवर,तुमच्या धंद्यावर तिचा काडीचाही हक्क नाहीय. ती मुलगी आहे. तिचं लग्न झाल्यावर आपला आणि तिचा रिश्ता संपला.”

किती स्वार्थी होता मुन्ना! किती आपमतलबी! काय हक्क होता त्याचा ह्या वास्तूवर? कमलच्या मदतीनेच तर हे घर आज जैनांचं राहिलं होतं. पण सुरेंद्र(मुन्ना) ते सगळं सोयीस्करपणे विसरून आपल्या पुरुषत्वाचे हक्क बजावू पाहत होता. आणि कमल! तिच्यात ह्या अन्यायाला प्रतिकार करायची शक्ती आहे का? त्यांची लाडकी कमल तिच्या नशिबात असलेल्या पुरुषांमुळे अक्षरशः देशोधडीला लागणार होती का? कमल.....अशी कमकुवत निघालीय? तिने श्रमाने कमावलेल्या पैशावर हे सगळे पुरुष टपून बसले आहेत. आतापर्यंत तिचा पैसा त्यांनी हक्काने वापरलाच पण यापुढेही वापरायला बघत होते. कमलच्या भोवती फणा काढून उभ्या राहिलेल्या नागांना त्यांनीच स्वतःच नव्हतं का दूध पाजून वाढवलं? कमलला ‘तू मुलगी! तुझं

जगातलं स्थान दुय्यम!' म्हणून त्यांनीच नव्हती का शिकवण दिली? कमल त्यांच्या उपदेशाला अनुसरून आता वागत होती. यात तिची चूक कशी म्हणता येईल? प्रेमनाथजींचाच सगळा हिशोब चुकला होता. कारण कमल तिला दिलेल्या शिकवणीनुसार वागत होती. पण बाकी सगळे?

प्रेमनाथजी शाळेत असतानाच त्यांचे आईवडील वारले. प्रेमनाथजींना दोन मोठे भाऊ व एक बहीण होती. प्रेमनाथजी सर्वात लहान. वडील पन्नाशीला पोचल्यावर जन्मले होते. वडील श्रीमंत नसले तरी सुखवस्तू होते. त्यांनी प्रेमनाथजींची आई गेल्यावर घर व इतर होतं नव्हतं ते सगळं प्रेमनाथजीच्या नावावर ठेवलं होतं. त्यांचं कॉलेज शिक्षण व्हावं असा वडिलांचा हेतू होता. वडील वारले तेव्हा प्रेमनाथजींची शाळा संपायला अजून दोन वर्षे होती. प्रेमनाथजींच्या सर्वात मोठ्या भावाने आपल्या बायकामुलांना बदली होते म्हणून प्रेमनाथजींच्या नावावर असलेल्या घरात राहायला पाठवलं. आणखी एक वर्षाने प्रेमनाथजींहून सात-आठ वर्षांनी मोठी असलेली श्रीमंत कुटुंबात लग्न झालेली बहीण विधवा झाली. तिला मूलही नव्हतं. तिला तिच्या सासरच्या माणसांनी वैधव्य आल्यावर जी माहेरी पाठवली ती परत नेलीच नाही. त्यामुळे प्रेमनाथजींची मोठी बहीण विमल पण तिथेच राहायला आली.

प्रेमनाथजींची शाळा संपताच मोठ्या भावाने त्यांना एका दुकानात हरकाम्या म्हणून नोकरी लावली. "तुला कॉलेजात पाठवायला पैसे नाहीत. वडिलांनी ठेवलेले पैसे संपले." एवढंच त्यांनी प्रेमनाथजींना सांगितलं. दुकानाच्या मालकाने मागेच एका कोठीच्या खोलीत प्रेमनाथजीना झोपायला जागा दिली. प्रेमनाथजी काय ते समजले. त्यांचा भावाशी संबंध कायमचा तुटला.

विमल मधूनमधून त्यांना भेटायला यायची. त्यांच्यासाठी खायला पदार्थ आणायची.

कफल्लक प्रेमनाथजींनी त्या दुकानदाराकडून धंदा शिकून स्वतःचा धंदा सुरु केला. धंदा नीट चालू होताच त्यांनी स्वतःसाठी राहायला लहानशी जागा घेतली. त्यांनी जागा घेतल्याचं कळताच त्याची बहीण विमल त्याच्याकडे येऊन "मला तुझ्याकडे राहायला येऊ दे. येवढी माझ्यावर दया कर." म्हणून रडू लागली. प्रेमनाथजींनी ताबडतोब तिला आपल्या घरात घेतली.

तेथून पुढे प्रेमनाथजींची भरभराटच होत गेली. मुली सांगून आल्या.सरोजिनीदेवींशी त्यांचं लग्न झालं. दोन मुलगे झाले. त्यांनी घर बांधलं. प्रेमनाथजी चाळीशीला पोचल्यावर अपेक्षा नसताना कमलचा जन्म झाला. कमल लहान असतानाच प्रेमनाथजींच्या आणि सरोजिनीदेवींच्या कमल फार हुशार आहे हे लक्षात आलं. तिचं तीव्र निरीक्षण,चौकस बुद्धी,वाचनाची आवड पाहून ती मुलगा झाली नाही याचं सरोजिनीदेवीना वाईट वाटायचं,तर प्रेमनाथजींना आपल्या मुलांना तिची हुशारी आली नाही याची खंत वाटायची. त्याचे दोन्ही मुलगे मुन्ना व रोहित अभ्यासात जेमतेमच होते. मोठा मुलगा मुन्ना सरोजिनीदेवीच्या माहेरी पहिला नातू म्हणून फार लाडका होता. लहानपणापासून त्याला हजारो गुन्हे माफ होते. वाढणाऱ्या व्यापामुळे प्रेमनाथजी जवळजवळ घरी नसतच. मुन्ना जसा मोठा झाला,तसे त्याच्या हातात बरेच पैसे खेळू लागले. आई किंवा आत्याकडून तो पैसे मागून घेई. तो पंधरा-सोळा वर्षांचा झाल्यावर प्रेमनाथजींनी त्याला

धंद्यात घालायचा प्रयत्न केला पण त्याला शिस्तच नव्हती म्हणून शेवटी कसाबसा शाळेतून पास झाल्यावर त्याचं नाव कॉलेजात घातलं. तिथे तो गटांगळ्या खात,टिवल्या-बावल्या करत दिवस काढत राहिला. रोहितनेपण मोठ्या भावाचाच कित्ता गिरवला.

कमल पाच वर्षांची झाल्यावर आणखी एक वैशिष्ट्य सर्वांना जाणवलं. ती स्पष्टवक्ती,धीट आणि तडफदार होती. कुणाला घाबरायचा तिचा स्वभावच नव्हता. हे मात्र जुन्या वळणाच्या सरोजिनीदेवींना आणि वैधव्य आलेल्या विमलला पसंत पडलं नाही. “मुलीला असं वागून चालणार नाही. त्यांना नरमाईनं घ्यायला हवं. अखेर त्यांच्या नशिबी सुख आलं तर ठीक! नाहीतर हाल सोसायची तयारी हवी.” असं सरोजिनीदेवींनी म्हटलेलं प्रेमनाथजींना आठवत होतं. प्रेमनाथजींनी त्या बाबतीत फारसं डोकं घातलं नाही. ‘मुलींना सांभाळायची जबाबदारी घरातल्या बायकांची’ असं त्यांचं मत होतं. तरीपण या सर्व विचारसरणीत काही चुकतंय असं त्यांना जाणवलं,पण काय चुकतंय ह्यावर नेमकं बोट ठेवता आलं नाही.

कमल पंधरा वर्षांची होईपर्यंत तिच्यातील तडफ,धाडस,वाद घालण्याची वृत्ती सारं काही नाहीसं झाल्याचं प्रेमनाथजींच्या लक्षात आलं. ही बदललेली कमल आणि निसर्गाने जन्माला घातलेली कमल यात काय फरक आहे हे पण त्यांना कळलं. त्यांना त्या बदलाचं थोडं वाईटच वाटलं. त्यांनी तसं बोलून दाखवल्यावर सरोजिनीदेवी रागावल्या. “मुली लहानपणी हूड असतात कधी कधी त्यांना नीट शिकवून सासरी पाठवायचं काम आपलं! तुम्हाला काय तिला लढाईवर पाठवायची आहे? आणि हे  पहा....” सरोजिनीदेवी हसून म्हणाल्या. “ती मोठी होत चाललीय,आता तिच्या लग्नाचं बघा बघू!”

सरोजिनीदेवी व प्रेमनाथजींची जमात अजून इतर काही जमातीप्रमाणे बदललेली नव्हती. अजूनही त्यांच्यात लग्न लवकरच होत. बायका पडद्यात नसल्या तरी घराबाहेर एकट्या पडत नसत, व कॉलेजात जाणाऱ्या तर विरळयाच.

“लग्न!” प्रेमनाथजींनी पत्नीकडे डोळे विस्फारून पाहिलं.

“मला कॉलेजात जायची संधी मिळाली नाही. मुलं दिवे लावतायत कॉलेजात. ही एक हुशार मुलगी निघालीय. सतत पहिला नंबर असतो तिचा! स्कॉलरशिप मिळालीय. मुळीच मी तिचं लवकर लग्न करणार नाही! शिवाय शिक्षण नव्हतं म्हणून विमलची काय परिस्थिती झाली होती ते ठाऊक आहे ना? बायकांनीही स्वावलंबी असायला पाहिजे.”

प्रचंड वादावादीनंतर कमल मुलींच्या कॉलेजात सायन्सला गेली. तिथे इंटरसायन्सला पहिली आली. तिने मेडिकलला जायचं म्हटल्यावर तर घरात वादळच उठले, पण प्रेमनाथजींनी पत्नीचं ऐकलं नाही. कमलला मेडिकलला पाठवली. तिच्या आईने कमलवर सतराशे छपन्न बंधनं घातली. मेडिकलला गेल्यावर दोन वर्षांनीच तिचं लग्न आपल्या दुसऱ्या नातेवाईकाच्या मुलाशी ठरवलं. हुंड्याचा आकडा ऐकून तो मुलगा व त्याचे आईवडील थांबायला तयार झाले. डॉक्टर होताच कमलचं लग्न झालं. तिने हाउस जॉब करून गायनाकॉलॉजीत एम.डी.केलं, व दवाखाना

आणि लहानसं नर्सिंग होम काढलं. तीन-चार वर्षात ते चांगलं चालूही लागलं. आपल्या मुलीच्या हुशारीचं चीज झालं ह्या खुषीत प्रेमनाथजी होते.

ह्याच सुमारास त्यांची प्रकृती बिघडायला सुरवात झाली. त्यांनी धंदा विकून टाकायचा विचार केला पण सरोजिनीदेवीच्या हट्टाखातर मुन्ना व रोहित यांना धंदा चालवायची संधी दिली. तेव्हाच त्यांना वाईट बातमी कळली. कमलच्या नवऱ्याच्या प्रदीपच्या व त्याच्या कुटुंबाच्या धंद्याला खूप खोट आली. प्रदीपने आपल्या कुटुंबाचा धंदा सावरायचा एक मार्ग शोधला होता. तो म्हणजे कमलला अरबस्तानात काही वर्षांसाठी पाठवणं. तिथे प्रदीपच्या एका मित्राकडून तिला चांगली नोकरी मिळत होती. पगार डॉलरमध्ये असल्याने त्याचे भारतात खूप पैसे होणार होते. त्या मदतीने प्रदीपला धंदा परत सरळ करायचा होता.

कमलची मुलगी रीना प्रदीपच्या आईकडेच राहणार होती. प्रेमनाथजींना हे काही पटलं नाही. आपल्या मुलीला दूर पाठवून प्रदीप व त्याचे कुटुंबीय तिच्या शिक्षणाचा व ज्ञानाचा गैरफायदा घेत आहेत,असं त्यांना तीव्रतेने जाणवलं. पण आता कमल त्यांची राहिली नव्हती. ते काय बोलणार होते? एक दिवस कमल व प्रदीप अरबस्तानातल्या छोट्या देशात गेले. प्रेमनाथजींना आपल्या आयुष्यात अंधार झाल्यासारखं वाटलं. प्रदीप तिला सोडून परत आला. कमलकडून पैसे येऊ लागले. चार वर्षात प्रदीपचा धंदा सरळ चालू झाला. पण आता प्रदीपच्या कुटुंबाला कमलच्या पैशाचा मोह सुटेना. कमल परत येण्याऐवजी प्रदीपच येऊन-जाऊन भारतात आणि अरबस्तानात राहू लागला. रीना कमलबरोबरच राहून शाळेत जाऊ लागली. कमल मधून-मधून सुट्टीत भारतात येत असे.

“तिचे हाल चाललेत! हे कसलं जीवन? एकटी एकटीने दिवस काढायचे? आपल्या माणसांपासून दूर राहायचं?” अशी प्रेमनाथजींना खंत वाटायची पण ते काय बोलणार होते? सरोजिनीदेवींना पण वाईट वाटायचं.

“तिला शिकवलं हेच चुकलं,” त्या म्हणायच्या.

“ह्या माणसांनी पैशासाठी अक्षरशः घराबाहेर काढून तिला घाण्याला जुंपलीय.”

“शिकली आणि पैसे मिळवले तरी शेवटी बाई ती बाईच! नवऱ्याच्या ताटाखालचं मांजरचं! आयुष्यातच तिच्या वाटेला कष्ट आले.” विमल म्हणायची.

प्रदीप गावाबाहेरच्या एका बाईकडे मधून मधून जात असल्याची बातमी पण एका स्नेह्याने प्रेमनाथजींच्या कानावर घातली. प्रेमनाथजी हताश झाले.

पुढच्या सुट्टीत कमल आलेली असताना प्रेमनाथजी तिला म्हणाले,

“कमल तू  ठासून सांग ना प्रदीपला, की आता तुला परत यायचंय म्हणून! कंटाळा नाही का येत तुला?”

“नाही,आता सवय झालीय!” कमल म्हणाली.

पेशंटचा माझ्यावर विश्वास बसलाय शिवाय कामापुढे विचार करायला सुद्धा फुरसत नसते.” मग ती हसली.

“माझं ठीक चाललयं तुम्ही काळजी जरू नका. परत आले तर घरात सारखी धुसफूस होईल. निदान तिथे माझ्या मनाला शांतता तरी लाभते!”

कमल तिथे असतानाच मुन्ना त्यांच्याकडे आला.

“कमलचे सगळे पैसे प्रदीपला का मिळावेत?” तो आपल्या वडिलांना म्हणाला.

“आपल्याला थोडे पैसे पाठवायला सांगा ना.” तिचं लग्न झालंय. तिच्या पैशावर आपला हक्क नाही!” प्रेमनाथजींनी सांगितले.

“तिला तुम्ही शिकवलं. तिच्या लग्नात एवढा हुंडा दिला आणि आपला हक्क कसा नाही?” मुन्ना रागावून म्हणाला.

“निदान हुंडयाएवढ्या पैशावर तरी हक्क आहेच. शिवाय मला पैशाची जरुरी आहे. धंद्यात खोट आलीय.”

प्रेमनाथजी चमकले. सुरवातीला धंदा मुन्ना व रोहितच्या हातात दिल्यावर त्यांनी बारकाईने लक्ष दिलं होतं. पण गेल्या दोन वर्षात त्यांचा हृदयविकार फार बळावला होता. त्यामुळे त्यांनी धंद्याकडे दुर्लक्ष केलं होतं.

“हे बघ तुला तिच्याकडून पैसे घ्यायचेच असले तर कर्ज म्हणून घे. आणि प्रदीपला कळू देऊ नकोस.”

परत जाण्यापूर्वी कमलने त्यांना सांगितलं. “मी पाठवते आपल्या धंद्यासाठी पैसे! बहुतेक सर्व पैसे माझ्या व प्रदीपच्या नावावर बँकेत आहेत. पण दर महिन्याला मी थोडे वरखर्चाला वेगळे दुसऱ्या अकाऊंटमध्ये ठेवते,ते खर्चच केले नाहीत. त्यातले पाठवते.”

“नको नको, ते नकोत, ते तुझ्यासाठी राहू देत. तुला कधी लागले तर. आम्हाला तू सरळ प्रदीपच्या परवानगीने कर्जाचे पैसे दे.” प्रेमनाथजीनी तिला सांगितले.

“मी आधीच विचारलंय त्यांना! ते म्हणाले दे थोडे. जास्त नको. तुझ्या भावांना दिलेले पैसे बुडीतच जाणार! धंदा कसा चालवायचा हे ते शिकलेलेच नाहीत बघ.”

“आपल्या जावयानेही मुन्ना-रोहितची कुवत ओळखलेली दिसतेय.” प्रेमनाथजींनी खिन्नपणे विचार केला. आणि त्यांनी लगेच मृत्युपत्र केलं. त्यात रहातं घर त्यांनी सर्वांच्या नकळत कमलच्या नावावर करून टाकलं. सरोजिनीदेवींचही तसचं मृत्युपत्र करवलं.

पुढची दहा वर्षे एकूण परिस्थिती तशीच राहिली. सरोजिनीदेवी पण वृद्ध झाल्या. मुन्ना,रोहितची चार मुलं चांगली मोठी झाली. मुन्नाची मुलगी लग्नाला आली.

विमल आजाराने मृत्यू पावली. प्रेमनाथजी अगदीच बिछान्याला खिळले. रोहित,मुन्नाचा धंदा अगदी डबघाईला आला. सरोजिनीदेवीचे दागिने मोडून झाले. सटर-फटरही विकलं गेलं. कमलने पाठवलेल्या पैशावरच सगळ कसबसं चाललं होतं.

एवढ्यात कमलच पत्र आलं. “प्रदीपचा सगळ्यात मोठा डॉक्टर भाऊ अमेरिकेला दहा वर्षांपूर्वी गेलाय. ते तुम्हाला ठाऊकच असेल. तो प्रदीपला व मला कायमचा अमेरिकेला राहायला बोलावतोय. प्रदीपला अगदी जायचंच आहे पण मला ही नोकरी सोडावी लागेल. मग तर तुमचं कसं होईल? प्रदीप म्हणतोय की,अमेरिकेत डॉक्टरला खूप पैसे मिळतात. मला पैशाचा हव्यास नाही. पण प्रदीप स्वतःचा धंदा दुसऱ्या भावावर सोपवून माझ्याबरोबर अमेरिकेत येणार असं म्हणतोय.

“मला मोह पडतोय, कारण माझा संसार कदाचित तिथे नव्याने सुरु होईल. अशी मला अशा आहे.

शिवाय रिनाने इथेच भेटलेल्या एका इंग्लिश माणसाशी लग्न केलंय. तो स्कूल टीचर आहे. आमचा विशेषत: प्रदीपचा फार विरोध होईल म्हणून तिने स्वतःच लग्न करून टाकलं. ती इंग्लंडला राहायला लवकरच जाईल. तिचा तरी काय दोष? लहान वयात माझ्याकडे राहिल्याने तिला भारताविषयी एवढी ओढच नाही. तिचा नवरा रिचर्ड स्वभावाने चांगला आहे.” इ.इ........

प्रेमनाथजींनी थोडाही विचार न करता उत्तर लिहिलं.

“तुझ्या हिताचं असेल ते तू कर. आमचा सर्वांचा,तुझ्या भावांचा तू मुळीच विचार करू नकोस. त्यांचं काय होईल ते होऊ दे. त्यांना संभाळणं आता देवाच्या हातात आहे. तू आत्तापर्यंत इतरांसाठी आयुष्य घालवलंस. आता स्वतःसाठी घालव.”

अमेरिकेला गेल्यावर वर्षभर कमलची अगदी त्रोटक खुशालीची पत्रं आली. आजारी प्रेमनाथजींना तिचं काही बिनसलं आहे, अशी शंका आली होती. पण सरोजिनीदेवींच्या आजारपणामुळे त्यांना कमलचा विचार करण्यासही वेळ झाला नाही. सरोजिनीदेवी खूप आजारी झाल्यावर त्यांनी कमलचा ध्यास घेतला. कमलला प्रेमनाथजींनी अनेक पत्रे पाठवून ती आली नाही. शेवटी सरोजिनीदेवी गेल्यावर रीना मात्र इंग्लंडहून आली. तिला प्रेमनाथजींनी डोळ्यात पाणी आणून कमलला भेटून यायची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मन देऊन रीना व रिचर्ड अमेरिकेला गेले. आज प्रेमनाथजींना रीनाचं पत्र आलं. तेही मोघमच होतं. “आईला घेऊन परत येतोय.” एवढंच तिने लिहिलं होतं. परत येण्याचा दिवसही लिहिला नव्हता.

एव्हाना मुन्ना व रोहितने धंदा बंद करून धंद्याची जागा दुसऱ्या कुणाला भाड्याने दिली होती. त्या मिळकतीतून त्यांचं कसंबसं चाललं होतं. सरोजिनीदेवीच्या मृत्यूनंतर त्यांच्या मृत्यूपत्रावरून आपलं घर कमलच्या नावावर होणार आहे ह्याचा मुन्ना व रोहितला शोध लागला. मुन्ना भयंकर चिडला होता. कमलचा नवरा प्रदीप आपणासर्वांना घराबाहेर काढेल असं त्यांचं म्हणणं होतं. कमल हातात सापडली तर तिचा खून करण्याची धमकी तो वडिलांना देत होता.

दोन आठवड्यांनी कमल व रीना परत  आल्या. “आईला काही झालं तरी अमेरिकेला जाऊ देऊ नका. माझ्या नालायक वडिलांच्या हातात ती पुन्हा पडता कामा नये.” असं सांगून रीना परत इंग्लंडला गेली.

कमल खंगलेली दिसत होती. सुरवातीला ती आल्यावर तरी मुन्नाने तोंड बंद ठेवलं. हळूहळू कमलच्या तोंडावर तजेला आला. पैसाही तिच्याकडे नव्हता. तरी अरबस्तानात तिने ठेवलेले पैसे अजून होते. त्यातले थोडे मागवून तिने घरातली अडचण कमी केली. मेडिकल स्कूलमध्ये जाऊन ती कुणाकुणाला भेटू लागली.

“तुला कधी परत जायचंय कमल?” प्रेमनाथजीनी एक दिवस तिला विचरलं.

“आता कधीच नाही! मी इथेच राहणार.” कमलने आपला निश्र्चय जाहीर केला.

दुसऱ्या दिवशी ती वकिलाला जाऊन भेटली. आपल्या सासरी तिने पाऊलही ठेवलं नाही. त्यांच्यापैकी कुणी तिला भेटायलाही आलं नाही.

एक दिवस अकस्मात प्रदीप आला. तो सरळ प्रेमनाथजी व कमल होते त्या खोलीतच आला. आणि कमलला गुरकावून म्हणाला,

“घरी चल! मला चुकवून परत आलीस का?”

“प्रदीप, तुझा आणि माझा संबंध संपला. मी  कोर्टात वकिलामार्फत घटस्फोटासाठी अर्ज दिलाय. माझ्या इच्छेविरुद्ध तू आता मला कोठेही नेऊ शकत नाहीस.”

“कमल,मूर्खपणा करू नकोस. अमेरिकेत तू गडगंज पैसा मिळवशील!”

“कशासाठी? तुझी आणि तुझ्या भावांची भर करायला का? ह्यापुढे कामाचं ओझं उचलून तुम्हा सर्वांना पोसायला मी तयार नाही. चालता हो इथून!”

प्रदीप चमकला. दारात उभे असलेले मुन्ना व रोहित पण चमकले. कमल कधीच अशी बोलत नसे.

“कमल. तुझी गैरसमजूत झालीय. तू मला पत्नी म्हणून हवी आहेस.” प्रदीप म्हणाला.

“तुझं आणि माझं ते नातं कधीच संपलंय. मी तुझ्या दृष्टीने होते पिळलं की पैसे देणारं मशीन! आता माझी सारी सहनशक्ती संपलीय. पिताजींनी हे घर माझ्या नावावर ठेवलयं. हे जगजाहीर झाल्याचे तुलाही कळलंच असेल. ह्या घराचीही तू हाव धरू नकोस. मी ते माझ्या भाच्यांना देणार आहे.”

दाराबाहेर उभे राहिलेले मुन्ना व रोहित शरमिंदे झाले.

धुसफूसत प्रदीप निघून गेला. कमलचा हा नवा अवतार पाहून सगळेच हादरले होते. प्रेमनाथजीना प्रदीप गेल्यावर राहवेना. केवढ्या आशेने कमल अमेरिकेला गेली होती. ‘काय झालं तिथे म्हणून ती अशी बिथरली?’ हा प्रश्न त्यांना सतावू लागला.

“कमल,अमेरिकेत काय झालं?”

सगळे निघून गेल्यावर त्यांनी विचारलं.

“प्रदीपचा भाऊ वीरेंद्र अमेरिकेला गेला आणि त्याने लायसेन्स मिळवून प्रॅक्टिस सुरु केली. नंतर त्याने एका डॉक्टरांचा ग्रुप एकत्र केला. आम्हाला बोलवायचा हेतू हा होता की एकदा मी लायसेन्स मिळवून त्यांच्याबरोबर प्रॅक्टिसमध्ये गेले की,सतत मला कामाला लावायचं. कॉलवर ठेवायचं. अमेरिकेत डॉक्टरांना खूप पैसे मिळतात. माझे पैसे घेऊन मोठा बिझिनेस काढायचा बेत होता त्यांचा!”

“माझ्यावर अमेरिकेत प्रॅक्टिस करता येण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या परीक्षा देण्याची सक्ती करण्याच्या प्रयत्नांत होते वीरेंद्र आणि प्रदीप! तिथे गेल्यावर मला त्यांचे सगळे बेत कळले! मी त्यांचं ऐकत नाहीसं पाहिल्यावर जवळ जवळ नजरकैदेतच ठेवलं होतं त्यांनी मला! शिवाय मी मिळवलेले अरबस्तानातले सगळे पैसे माझ्या नकळत प्रदीपने जॉईन्ट अकाऊंटमधले काढून स्वतःच्या नावावर केले. त्यामुळे मी कफल्लकच होते. मला अमेरिकेतून येण्याचा मार्गच सापडत नव्हता. रीना आल्यावर त्यांचा नाईलाज झाला. ‘कारण आईला नेऊ देत नाही.’ असं म्हटल्यावर रिचर्डने त्यांना पोलिसांना फोन करतो अशी धमकी दिली. रीना आली नसती तरी मी निसटणारच होते कशी तरी!”

प्रेमनाथजी हताश झाले. “कुठे जाणार ही आता? अमेरिकेत नवरा गुलामीत राबवायला उठलाय! इथे भाऊ गळा घोटायला उठलेत!”

कमलच्या बाबतीत काहीतरी चुकलं होतं. प्रेमनाथजींना तीव्रतेने जाणवलं. नुसत्या शिक्षणाने किंवा पैसा मिळवण्याच्या कुवतीने स्त्री स्वतंत्र होत नाही. उलट त्या कुवातीसाठी तिला राबवून घेणारी माणसंही असतात. घरात राबणं किंवा डॉक्टर म्हणून राबणं शेवटी एकच. शिक्षणाबरोबर स्वतःच हित पाहण्याचं शिक्षण पण दिलं पाहिजे होतं कमलला आपण!

त्यांच्या डोळ्यासमोर छोटी तडफदार कमल उभी राहिली. तिला ठेचून ठेचून तिच्यातली तडफ,स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती,तिच्या हितासाठी म्हणून तिच्या आईने नष्ट केली होती. आणि हे लक्षात येऊनही प्रेमनाथजींनी तिच्या आईला विरोध केला नव्हता. परिणामी कमल हुशार पण दुबळी झाली होती.

आपल्यावर होणाऱ्या अन्यायावर प्रतिकार कारण तिला वर्षानुवर्षे जमलं नव्हत. जन्मभर राबून आणि प्रचंड पैसा कमावून ती कफल्लकच राहिली होती. कारण आईच्या शिकवणीप्रमाणे तिने नवरा म्हणेल तशी पावलं टाकली होती. स्वार्थी प्रदीपला तिने केव्हाच घटस्फोट द्यायला हवा होता.

आता तिचं कोण होत जगात? ते स्वतः परावलंबी व आजारी! थोड्याच दिवसांचे सोबती! कमल अगदी एकटी आणि निराधार होती. विमलसारखीच.

“बेटी,तू यापुढे काय करणार आहेस?” प्रेमनाथजींनी विचारलं.

“तुमच्याबरोबर राहणार आहे!” कमल हसून म्हणाली.

"नंतर मी एका संस्थेत काम करणार आहे. गरजू माणसांवर फुकट उपचार करण्यासाठी काढलीय ही संस्था एका डॉक्टरने! मेडिकल कॉलेजात मला तिचा शोध लागला. त्यांना आणखी एका डॉक्टरची जरुरी आहे. त्यांनी माझा अर्ज आनंदाने स्वीकारला. मला राहण्याला जागा आणि थोडे पैसे मिळणार आहेत. हयापुढे मला तिथे आप्पलपोटया,स्वार्थी, पैशाला टपलेल्या माणसासाठी काम करायचं नाहींय. परोपकारासाठीच करायचंय."

कमलने तिच्या भविष्याचा विचार करून निर्णय घेतला होता. हया परिस्थितीत तो योग्यही होता.

प्रेमनाथजींना आणखी काय बोलावं ते सुचेना. थरथरत्या आवाजत ते म्हणाले. "कमल तू लहान असताना मी तुझा फार मोठा गुन्हा केला. बेटी मला क्षमा कर!"

"कसला गुन्हा?" कमल त्यांच्याकडे विस्फारलेल्या डोळ्यांनी पाहत विचारू लागली.

पूर्व प्रसिद्धी : रागिणी.

तारेवरची कसरत ,श्रीविद्या प्रकाशन,जून १५,१९८७.